

# पारनेर दर्शन

वर्ष १ अंक २०५, शुक्रवार २६ एप्रिल २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये



# इंग्रजी बोलतो म्हणून फार शहाणा झाला असे नाही!

## ■ शरद पवार यांचा खा.डॉ. सुजय विखे यांचा टोला ■ नीलेश लंके यांच्या प्रचारार्थ राहुरी येथे सभा

राहुरी : श्रीकांत जाधव, ऋषी राऊत

**इंग्रजी बोलतो म्हणून शहाणा झाला असे नाही. तुमचे इंग्रजी बोलणे तुम्हाला लक लाभ ! खा. डॉ. सुजय विखे यांना असा टोला लगावत नीलेश लंके यांच्यासारखा फाटका माणूस फाटक्या माणसाच्या हिताची जपवणूक करणारा असल्याने लंके यांना मताधिक्क्याने लोकसभेत पाठविण्याचे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी केले.**

महाविकास आघाडीचे उमेदवार नीलेश लंके यांच्या प्रचारार्थ राहुरी येथे आयोजित करण्यात आलेल्या प्रचार सभेत शरद पवार बोलत होते. यावेळी यावेळी माजी खासदार बापूसाहेब तनपुरे, माजी मंत्री प्राजक्त तनपुरे, आमदार लहू कानडे, मा. आ. दादा कळमकर, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख प्रा. शशिकांत गाडे, आपचे जिल्हाध्यक्ष राजू आघाव, रावसाहेब म्हस्के, संदीप वर्पे, योगिता राजळे, अरूण कडू, किरण कडू, अरूण तनपुरे, सचिन म्हसे, अमृत धुमाळ, राजूभाऊ शेटे, धनराज गाडे, बाळासाहेब आढाव, प्रकाश देठे, सुरेश वाबळे, मच्छिंद्र सोनवणे, संपत म्हस्के यांच्यासह मोठा जनसमुदाय यावेळी उपस्थित होता.

दहा वर्षे ज्यांच्या हाती सत्ता आहे त्यांनी काय काम केले असा सवाल करून पवार म्हणाले, मोदी सरकारने केलेली कामे या निवडणूकीच्या प्रचारात मांडली पाहिजेत मात्र तसे होताना दिसत नाही. दहा वर्षांपूर्वी मनमोहनसिंह यांच्यावर टीका करून मोदी हे महागाईवर बोलत होते. सत्ता हाती दिल्यानंतर १५ दिवसांत ५० टक्के महागाई करणार असे मोदी सांगत होते. ७० रूपयांचे पेट्रोल १०६ रूपयांवर गेले हे पन्नास टक्के महागाई करण्याचे वचन का ? ४०० रूपयांचे सिलेंडर ११६० वर गेले असल्याचे पवार म्हणाले.

### त्यांच्या गॅरंटीचा चेक वटत नाही !

या निवडणूकीत मोदी गॅरंटीचा गवगवा केला जातोय. ही टीकाऊ गॅरंटी नाही. त्यांच्या गॅरंटीचा चेक वटत नाही. मोदी यांनी सत्तेचा गैरवापर केला. ईडी, सीबीआयच्या माध्यमातून खोटया केसेस केल्या. त्यांच्या विचाराविरोधात वागले तर इडी, सीबीआयचा वापर करून त्रास देण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचे पवार म्हणाले.

### केजरीवालांना तुरूंगात डांबले

दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल साधा माणूस. लोकांशी बांधीलकी असलेला मुख्यमंत्री. शिक्षणाच्या, आरोग्याच्या सोई त्यांनी उपलब्ध करून दिल्या. दिल्लीची जनता त्यांच्यावर खुष आहे. केजरीवाल यांनी टीका केली म्हणून त्यांना तुरूंगात डांबले गेले. झारखंडच्या मुख्यमंत्रयांनी मागितलेली मदत दिली नाही म्हणून मोदींवर टीका केली म्हणून तसेच पश्चिम बंगालच्या तिन मंत्रयांवर अशीच सुडभावनेतून कारवाई करण्यात आल्याची टीका पवारांनी केली.

### मोदींचे सिहासन उध्वस्त करू

सत्तेचा वापर संसार उभे करण्याऐवजी संसार उध्वस्त करण्यासाठी सुरू आहे. हुकूमशाहीच्या मार्गाने देश चालविण्याचा प्रयत्न सुरू आहे. या निवडणूकीच्या माध्यमातून आता मोदींचे सिंहासन उध्वस्त करू असा विश्वास पवार यांनी यावेळी व्यक्त केला.

### कांदा प्रश्नी आंदोलन केले म्हणून मी गुंड का ?

अलिकडेच विखे पिता पुत्र केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी भेटले. कांदा निर्यात बंदी उठविण्यासाठी भेट घेतल्याचा गवगवा केला. नगरच्या बाजार समितीमध्ये सत्कार स्विकारात निर्यात बंदी उठविली गेली नसती तर मते मागण्यासाठी गेलो नसतो अशी बतावणीही केली. निळवंडे, साकळाई, ताजनापुर या योजना झाल्या नाही तर निवडणूकीचा अर्ज भरणार नाही अशी प्रतिज्ञा करणारे खासदार यांचे काम खोटे बोल व रेटून बोल असे आहे. त्यांचे काम मात्र शुन्य आहे. विखे कुटूंबाने गेल्या ५० वर्षात जिल्हयात एखादा मोठा प्रकल्प आणला का ? दहा, विस हजार तरूणांना रोजगार मिळाला का ? त्यांच्या घराकडे जाणारा नगर-मनमाड रस्ता त्यांना करता आला नाही ते खासदार विकासाच्या काय गप्पा मारतात ? मी कांद्याच्या भावासंदर्भात आंदोलन केले, त्यामुळे माझ्यावर गुन्हा दाखल झाला, त्यामुळे मी गुंड का असा सवाल लंके यांनी यावेळी बोलताना केला.

### निळवंडेला त्यांच्या वाडवडिलांनी विरोध केला

दुष्काळी जिल्हा म्हणून नगरची ओळख. त्या काळात जिरायत भागाच्या जमीनी बागायती करण्यासाठी निळवंडे प्रकल्प उभा करण्याचा निर्णय झाला. मात्र त्या काळात आज लोकसभा निवडणूकीच्या रिंगणात जे विरोधी उमेदवार आहेत त्यांच्या वाड वडीलांनी विरोध केला. आता ते पुन्हा लोकसभेमध्ये जाऊ पाहत असल्याचे पवार म्हणाले.

### विखेंच्या नंतरच्या पिढीने काय दिवे लावले ?

धनंजय गाडगीळ, विठ्ठलराव विखे यांनी आशिया खंडातील पाहिला सहकारी साखर कारखाना उभा केला. विखे यांच्या नंतरच्या पिढीने काय दिवे लावले ? त्यांच्या डोक्यात सत्तेची हवा गेली असून आपले अपयश झाकण्यासाठी ते आता टीका टिपन्नी करीत असल्याचा आरोप पवारांनी केला.

### पवारांप्रमाणे कोणी निर्णय घेतले नाहीत

केंद्रात कृषीमंत्री असताना शरद पवार यांनी जे निर्णय घेतले असे निर्णय इतर कोणत्याही मंत्रयाने घेतले नाहीत. आपला देश कृषीप्रधान देश म्हणून ओळखला जातो. याच कृषीप्रधान देशात शेतकरी आत्महत्या करतोय ही शोकांतीका आहे. कांदा, सोयाबिन, कपाशी, दुधाच्या भावाची आज काय स्थिती आहे ? दुधाला ५ रूपये अनुदान देतो म्हणाले ते देखील मिळाले नाही. मग शेतकरी कसा सुखी होणार ? ज्यांना पाच वर्षापूर्वी आपण दिल्लीला पाठविले ते शेतकऱ्यांच्या प्रश्नावर एकदाही बोलले नाहीत.

नीलेश लंके
उमेदवार

### विविध घटकांच्या प्रश्नांसाठी नीलेश लंके 'हे'उत्तर

आमचा उमेदवार दिसायला फाटका आहे. दहा बाय दहाच्या खोलीत राहणारा हा माणूस. कांदा, कापूस, सोयाबिन आदी शेतकरी वर्गाशी निगडीत प्रश्न, स्पर्धा परिक्षा देणारे विद्यार्थी, वंचितांचे प्रश्न मांडण्यासाठी नीलेश लंके हेच एकमेव उत्तर असल्याचे पवार म्हणाले.

### पवारांनी 'डी' झोन केला खुला

नीलेश लंके यांच्या प्रचारार्थ राहुरी येथील शरद पवारांच्या प्रचार सभेत मंडप पूर्ण भरल्याने. अनेक नागरिक भर उन्हात उभे राहून सभा ऐकत असल्याचे शरद पवार यांना दिसताच त्यांनी 'डी' झोन खुला करण्याच्या सूचना पोलिसांना दिल्या. त्यानंतर डी झोन मध्ये येऊन नागरिकांनी सभा ऐकली. शरद पवारांनी सामान्य जनतेची घेतलेली काळजी सर्वांनाच भावल्याचे यावेळी दिसून आले.

### लंके सभास्थळी येताच एकच जल्लोष

लंकेच्या प्रचारार्थ राहुरीतील सभेत पोहोचत असताना निलेश लंके यांना ट्रॅफिक जाम झाल्याने सभास्थळी येण्यास उशीर झाला. प्राजक्त तनपुरे यांचे भाषण सुरू असतानाच निलेश लंके स्टेजवर येताच कार्यकर्त्यांनी एकच जल्लोष केला. हा जल्लोष व उत्साह बघून शरद पवार यांनीही हसतमुखाने निलेश लंके यांचे स्वागत केले.

### जनतेशी नाळ जोडणारा लोकप्रतिनिधी हवा

डॉक्टरकीचा डंका मिरवित अनेक पक्ष बदललेले उमेदवार भाजपाच्या चिन्हावर निवडणूक लढवित आहेत. ५ वर्षात केलेल्या कामांवर मते मागण्याऐवजी त्यांना आमच्या उमेदवाराच्या शिक्षणावर बोलण्याची गरज पडली. शिक्षणाऐवजी सामान्य जनतेशी नाळ जोडणारा लोकप्रतिनिधी हवा.

राजेंद्र फाळके
जिल्हाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार

### आमच्याकडे स्वाभिमानी गर्दी

काल, परवा विरोधकांची सभा झाली. ५०० रूपये देऊन असे सांगून गर्दी जमा केली. १०० रूपये आगाउ रक्कम दिली त्यानंतर उरलेली रक्कम दिलीच नाही.आज आमच्या सभेला पैसे देउन गर्दी जमा केलेली नाही इथे आलेले सर्वजण स्वाभिमानी नागरीकांची गर्दी असल्याचे माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांनी सांगितले.

### बाळाची हौस होईल !

विरोधी उमेदवार बाळाला कडेवर घेऊन फिरत आहेत. या बाळाची हौस सहा महिन्यात पुर्ण होईल, आज विरोधी उमेदवार त्यांना गोंजारून गोंजारून फिरवत आहेत. सहा महिन्यानंतर बाळाला कळेल ते काय चिज आहेत असे सांगत मंत्री प्राजक्त तनपुरे यांनी खा.डॉ. सुजय विखे व मा. मंत्री शिवाजी कर्डीले यांच्या राजकीय मैत्रीवर भाष्य केले.

### ४ तारखेला कळेल राहुरी काय चिज आहे

विरोधक सांगत आहेत की राहुरी आमचे होमग्राउंड आहे. होमग्राउंड म्हणणारांना ४ जुनला कळेल, राहुरी काय चिज आहे ते. मला विधानसभेला जे मताधिक्य मिळाले त्यापेक्षा अधिक मताधिक्य राहुरी तालुक्यातून मिळवून देउ. सर्व कार्यकर्त्यांना हाच आमचा आदेश असल्याचा संदेश मंत्री प्राजक्त तनपुरे यांनी यावेळी दिला. राहुरी तालुका ही कोणाची जाहागिरी नाही. राहुरी तालुक्याचे लचके तोडण्याचे काम त्यांनी केले त्यामुळे कोणी अम्हाला गृहीत धरू नये असा इशाराही मंत्री तनपुरे यांनी दिला.

### शेतकऱ्यांच्या प्रश्नावर संसद बंद पाडेल !

मला एकदा संधी द्या अशी भावनीक साद घालत शेतकऱ्यांच्या प्रश्नावर संसद बंद पाडली नाही तर नाव बदलेल असे सांगत जे बोलतो तेच करतो. व जे करतो तेच बोलतो. दुसऱ्याच्या खांद्यावर पंढरपूर करणारा मी नसल्याचे सांगतानाच महाराष्ट्रामध्ये विधानसभेमध्ये महाविकास आघाडीचीच सत्ता येणार असल्याचा विश्वास लंके यांनी व्यक्त केला.

### आमची शोलेची दोस्ती

आमदार प्राजक्त तनपुरे आपले मार्गदर्शक असून त्यांची हुशारी आणि माझा खमकेपणा पुढील काळात शेतकऱ्यांसाठी नक्की कामाला येईल , असे म्हणत आमची शोलेची दोस्ती असल्याचे महाविकास आघाडीचे उमेदवार निलेश लंके असे म्हणताच प्रचार सभेतील उपस्थित हजारो लोकांनी टाळ्यांच्या कडकडाटात दाद दिली.

### जिल्हयात सत्तेचा गैरवापर, दमदाटी

राज्यात उत्तम साखर कारखाना म्हणून ओळख असलेला राहुरी साखर कारखाना, मुळा प्रवरा विज संस्था या संस्था विखे यांनी बंद पाडल्या. शासकीय मेडीकल कॉलेज जिल्हयात होऊ दिले नाही. स्वतःच्या खाजगी मेडीकल कॉलेजमध्ये प्रवेश कशा पध्दतीन दिले जातात. हे वेगळे सांगण्याची गरज नाही. जिल्हयात सत्तेचा गैरवापर, दमदाटी सुरू असल्याचा आरोप पवारांनी केला.

### चांगल्या संस्थांमध्ये बोट घालण्याचे उद्योग

विखे कुटूंबाने आशिया खंडातील पहिला साखर कारखाना उभा केला. आजही या कारखान्यावर ८५० कोटींचे कर्ज आहे. असे असताना ज्या संस्था चांगल्या सुरू आहेत तिथे बोटे घालण्याचा विखे पिता-पुत्रांचा धंदा आहे. राहुरी, गणेश हे साखर कारखाने, मुळा प्रवरा विज संस्था विखे यांनी बंद पाडल्या. मुळा प्रवराचे २ हजार २०० कोटी रूपये थकविले. संस्था उभ्या करण्याऐवजी त्या बंद पाडण्याचा घाट विखे पिता पुत्र करीत असल्याचा आरोप लंके यांनी केला.

### सत्ता, संपत्तीवर नव्हे माणसांवर प्रेम करणारा मी

मी सत्ता अथवा संपत्तीवर प्रेम करत नाही. मी माणसांवर प्रेम करणारा आहे. ही शिवरायांची, साधू संतांची भुमी आहे. त्यांच्या पावलावर पाउल ठेऊन मी काम करतो. मी ध्येय वेडा माणूस असल्याचे लंके म्हणाले.





Shree Datta Bahuuddeshiya Sanstha's
**Saint Vivekanand Public School**
A/P-Jamgaon, Tal-Parner, Dist-Ahmednagar
PH-9860815843, 9420812001

**REQUIRED TEACHERS 2024-2025**

We are looking for passionate experienced /fresher, innovative and qualified teacher with good communication skill and fluency in English for following classes.

| Sr.No. | Subject | Qualification | No.of Post |
|---|---|---|---|
| 1 | Pre-Primary | H.S.C./Graduate/D.Ted | 4 |
| 2 | Primary | H.S.C/Graduate/D.Ted /B.Ed | 3 |
| 3 | Math's | B.sc/M.sc/B.ed | 2 |
| 4 | Science | B.sc/M.sc/B.ed | 2 |
| 5 | STT | B.A./M.A.B.ed/(His/Geo) | 1 |
| 6 | English | B.A./M.A.B.Ed | 3 |
| 7 | Marathi | B.A/M.A.B.Ed | 2 |
| 8 | Hindi | B.A/M.A.B.Ed | 1 |
| 9 | Art Teacher (Drawing) | Diploma ATD | 1 |
| 10 | Administrative Staff | Compuer knowledge | 1 |

Walk-in Interview with all document on Thursday 25 April 2024 10.00 AM to 3.PM at Above Address

Note -
- Salary commensurate based on skill, qualification and Experience.
- Training will be provided to Fresher candidate who are Passionate about Education



## स्मार्ट शेतकरी, स्मार्ट शेती
# शिवार

# मोसंबीतील फुल-फळगळ

**मोसंबीला भरपूर फुले लागतात, फळधारणाही भरपूर होते, परंतु एकूण फुलांच्या ०.५ ते १ टक्का इतकीच फळे काढणीपर्यंत हाती लागतात. म्हणून फळगळ ही मोसंबी पिकातील गंभीर समस्या आहे. फळधारणेपासून ते फळ काढणीपर्यंत वेगवेगळ्या कारणांमुळे फळगळ होते.**




नैसर्गिक कारणाव्यतिरिक्त, देठांच्या इजेमुळे, रोगांमुळे व फळमाशी आणि फळरस शोषण करणाऱ्या पतंगामुळे अर्धी कच्ची फळे पिवळी पडतात, सडतात व गळतात. फळगळ काही विशिष्ट काळात अतिशय तीव्र व जास्त प्रमाणात असते. मोसंबीमध्ये सुध्दा सुमारे १ ते २ लाखावरील फुलापैकी फक्त ०.२ ते २ टक्के एवढीच फळामध्ये रुपांतरीत होतात. या मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या फुलगळीची इतर बरीचशी कारणे असली तरी यासाठी मुख्यतः वातावरणातील आर्द्रता, कीड व रोग इत्यादी कारणीभूत आहेत. फुलगळ, फळगळ खालील प्रमाणे होते. फळझाडावर फुलांची निर्मिती झाल्यानंतर ती उमलत असताना त्यांची गळ होत असते. दुसरी फुलगळ १५ ते २५ दिवसांनंतर होते. या वेळी ज्या फुलांचे फळधारणेत रुंपातर झाले नाही अशी फळे गळून पडतात. फळधारणा झालेली अती लहान फळेदेखील गळून पडतात. बोरांच्या आकारांची व त्यापेक्षा मोठी झाल्यानंतर पक्व होईपर्यंत वाढ झालेली फळे देखील गळून मोठ्या प्रमाणात नुकसान होत असते. वाढ झालेल्या फळात इथिलिन तयार होते व त्यामुळे फळगळ होत असते. ढगाळ वातावरणात बुरशीचा प्रादुर्भाव होऊन देठाजवळ काळे डाग पडतात आणि फळे मोठ्या प्रमाणात गळून पडतात यालाच कोलेटोट्रीकम बुरशी असे म्हणतात. याच वातावरणात आर्मडस्केल कीडीचा प्रादुर्भाव होऊनही फळे मोठ्या प्रमाणात गळतात, त्यासाठी एकत्रितरीत्या बुरशीनाशक आणि कीटकनाशक फवारावे. यामध्ये कार्बेन्डाझीम २.५ ग्रॅम प्रति लिटर पाण्यात आणि डायमेथोएट १.५ मिली प्रति लिटर पाण्यात किंवा मॅन्कोझेब अधिक मेटालेक्झील हे संयुक्त बुरशीनाशक २.५ ग्रॅम प्रति लिटर पाण्यात आणि ॲसिफेट १ मिली प्रति लिटर पाण्यातून फवारावे.

### उपाय योजना करताना...

प्रकाश सापळ्यांचा उपयोग करावा. रात्री बागेत १०० वॅटचे बल्ब अधून मधून लावावेत. याखाली केरोसिन किंवा कीटकनाशकयुक्त पाणी असलेले पसरट भांडे ठेवावे. विद्यूत प्रवाह नसल्यास गॅसबत्तीचा वापर करता येईल. पतंग प्रकाश झोताकडे आकर्षित होऊन धडक देतात आणि भांड्यातील पाण्यात पडतात. पतंगाला आकर्षित करून मारण्यासाठी विषारी आमिषांचासुध्दा वापर करता येईल. त्यासाठी १० लिटर पाण्यात ५०० ग्रॅम गूळ आणि २० मि.लि. क्लोरपायरीफॉस मिसळून आमिषाचे द्रावण तयार करावे. साधारणतः २५० मि.लि. द्रावण मोठे तोंड असलेल्या डब्यात टाकून ते झाडावर टांगावेत. यासाठी रिकाम्या झालेल्या कीटकनाशकांच्या डब्यांचा वापर करता येईल. या पतंगाच्या अळ्या गुळवेल, वासनवेल किंवा तत्सम तणांवर उपजीविका करीत असल्यामुळे परिसरातील या तणांचा नायनाट करावा. खाली पडलेली फळे नियमित वेचून खड्ड्यात पुरून टाकावीत. रात्री ७.०० वाजताच्या दरम्यान ओलसर कचरा जाळून बागेत धूर करावा. परंतु यामुळे झाडांना इजा होणार नाही यांची दक्षता घ्यावी. मॅन्कोझेब अधिक मेटालेक्झील हे संयुक्त बुरशीनाशक २.५ ग्रॅम प्रति लिटर पाण्यातून पंधरा दिवसांच्या अंतराने दोन फवारण्या कराव्यात. या उपाययोजनांचा एकात्मीक पद्धतीने अवलंब केल्यास रस शोषण करणाऱ्या पतंगामुळे होणारी फळांची गळ काही प्रमाणात कमी करता येईल.

### फळगळीची महत्त्वाची कारणे...




झाडे रोगग्रस्त, कीडग्रस्त, दुखापत झालेली अथवा जास्त वयाचे असणे. झाडामध्ये ऑक्झीन या संजीवकाचे असंतुलन असणे. कर्बःनत्र गुणोत्तरामध्ये असंतुलन. सूक्ष्म अन्नद्रव्यांची कमतरता व झाडाची उपासमार. पाण्याच्या ताण किंवा अतिरिक्त वापर. तापमानातील चढउतार. ओलिताचे व्यवस्थापन बरोबर नसणे, कमी किंवा आधिक पाण्यामुळे फळझाडांस ताण बसतो. त्यामुळे फळ गळण्यास सुरुवात होते. संतुलित पाण्याचा वापर असल्यास फळझाडांवरील फळांना ताण बसत नाही. आंबिया बहाराची फळगळ रस शोषण करणाऱ्या पतंगामुळेसुध्दा होते. या किडीचे प्रौढ पतंग सांयकाळी ७ ते ९ दरम्यानच्या काळात फळांतील रस शोषण करतात. त्या ठिकाणी सुईच्या जाडीचे छिद्र तयार होते. त्यामुळे रोगजंतूना प्रवेश करण्यास मार्ग तयार होतो. रसात साखरेचे प्रमाण असल्यामुळे जंतुची वाढ होते. छिद्राभोवती फळे सडायला लागतात आणि फळे मोठ्या प्रमाणावर गळू लागतात. फळकुज (फायटोप्थोरा) मुळेही मोठ्या प्रमाणात फळांची गळ होते.



# जनावराच्या आहारात पाणी महत्त्वाचे!

**जनावरांचे योग्य पोषण होण्यासाठी तसेच दुग्धोत्पादन टिकवून ठेवण्यासाठी चारा छावण्यात तसेच स्वतःच्या गोठ्यावरसुद्धा जनावरांना स्वच्छ, थंड व मुबलक प्रमाणात पाणी तहान लागेल तेव्हा पिण्यास उपलब्ध असावे...**



चाराटंचाई व जनावरांच्या आहार नियोजनात फक्त हिरवा चारा, सुका चारा, पशुखाद्य व क्षार मिश्रानांचा विचार होतो; परंतु या सर्वाबरोबरच पाणीसुद्धा खूप महत्त्वाचे आहे. चांगला चारा पुरवून सुद्धा तहान लागेल तेव्हा पाणी उपलब्ध नसल्यास त्याचे योग्य पचन होणार नाही. दुष्काळात आधीच पाण्याची कमतरता असते आणि हिरवा चारा नसल्याने त्यातून मिळणारे पाणी सुद्धा मिळत नाही, म्हणूनच पाण्याची अधिक आवश्यकता असते.

### पाण्याचे महत्त्व...

जनावरांचे शरीर ७० ते ८० टक्के पाण्याने बनलेले असते. शरीरातील विवध स्त्राव, रक्त, लाळ, सांध्यातील वंगण इत्यादी सर्व पाण्यानी बनलेले असते. पाणी चाऱ्याला कोठी पोटात भिजवून किण्वन प्रक्रियेस मदत करते. चाऱ्याचे योग्य पचन होण्यासाठी गरज असलेली लाळ आणि पाचक द्रव्येसुद्धा पाण्यापासून बनलेली असतात. चाऱ्यातील घटक विरघळून ते रक्तामार्फत शरीरभर पोचविण्याचे आणि चाऱ्यातील न पचलेला भाग आतड्यातून बाहेर नेण्यासाठी पाणी मदत करते. पाणी कमी पडल्यास पचन क्रिया मंदावते आणि दुग्धोत्पादन घटते. दूध तयार करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर पाण्याची आवश्यकता असते. दुधात ८० ते ८५ टक्के पाणी असते. घामामार्फत व रक्ताभिसरण करून शरीराचे तापमान नियंत्रित करण्यासाठी पाण्याची आवश्यकता असते. शरीरातील विविध रासायनिक क्रिया पार पाडण्यासाठी तसेच शरीरातील टाकाऊ पदार्थ लघवी वाटे बाहेर काढण्यासाठी पाण्याची आवश्यकता असते.



### पाणी कसे अन् किती द्यावे...

जनावरांना सुका चारा खाल्यावर, दूध दिल्यावर आणि तहान लागेल तेव्हा पाण्याची गरज असते. सर्वसाधारणपणे पशुपालक दोन किंवा तीन वेळा जनावरांना पाणी पाजतात. त्यामुळे जनावराला तहान लागेल तेव्हा पाणी उपलब्ध होत नाही तसेच अनेकवेळा जनावरे गरज नसताना सुद्धा सवय म्हणून मालकाने पाणी ठेवल्यावर अधिक पाणी पितात. या दोन्ही गोष्टींचा परिणाम चाऱ्याच्या पचनावर होतो, त्यामुळे दूध उत्पादन मोठ्या प्रमाणावर घट येते. यावर उपाय म्हणजे जनावराला तहान लागेल तेव्हा स्वच्छ व थंड पाणी पिण्यास उपलब्ध असावे. मुक्त संचार गोठा पद्धतीत जनावरेमुक्त असल्याने तहान लागल्यावर पाणी पिवू शकतात, याचा फायदा एक ते दीड लिटर प्रति जनावर दूध उत्पादन वाढीवर झालेला पहावयास मिळतो. ज्यांच्याकडे मुक्त संचार गोठा नाही ते पशुपालक बादलीला फ्लोट वॉल्व्ह बसवून कमी खर्चात, बांधलेल्या जनावरांनासुद्धा २४ तास पाणी उपलब्ध करून देऊ शकतात किंवा सकाळी व संध्याकाळी चारा खाऊन झाल्यावर गव्हाणी स्वच्छ करून त्यात पाणी भरून ठेवून सुद्धा जनावरांना तहान लागेल तेव्हा पाणी पिण्यास उपलब्ध करून देता येईल.

### स्वच्छ पाणी पुरवठा

टंचाई काळात पाणी उपलब्धता नसल्याने जनावरे ओढे, नाले, तलावातील साठलेले व खराब पाणी पितात. अनेकवेळा गढूळ अस्वच्छ पाण्याचा पुरवठा गोठ्यांना होत असतो. अस्वच्छ साठलेले पाणी असल्यास त्यातून जनावरांना विविध रोगाची लागण होऊ शकते. पाणी साठविण्याचे हौद अनेक दिवस स्वच्छ केले जात नाहीत त्यात शेवाळ वाढून त्यातून विविध रोगजंतू पसरविले जाऊ शकतात. स्वच्छ व पिण्यायोग्य पाणीपुरवठा करण्यासाठी पाण्याचा हौद किंवा टाकी पंधरा दिवसांतून एकदा संपूर्ण कोरडी करून त्याला आतून चुना लावावा. त्यामुळे त्यात शेवाळ वाढणार नाही तसेच पाणी थंड राहून त्यातून कॅल्शिअमचाही थोडा पुरवठा होईल. गढूळ पाणी स्वच्छ करण्यासाठी पाण्यात तुरटी फिरवणे सारखा सोपा उपाय करू शकतो. बाजारात पाणी स्वच्छ करण्यासाठी सॅनिटायझर टॅबलेट ही उपलब्ध आहेत.

# शोभिवंत मत्स्यपालन व्यवसाय!

**शोभिवंत मत्स्यपालन व्यवसाय जागतिक स्तरावर वेगाने वृद्धिंगत होत आहे. यामध्ये विविध संवर्धन पद्धती आणि व्यावसायिक संधी उपलब्ध आहेत. शेतकऱ्यांना उपलब्ध जागेचा वापर चांगल्याप्रकारे करून स्वयंरोजगाराचे एक कायमस्वरूपी साधन या माध्यमातून उभे करणे शक्य आहे. सध्याच्या धकाधकीच्या जीवनशैलीमुळे वाढणाऱ्या तणावाला कमी करण्याचा पर्याय म्हणून लोकांच्यामध्ये शोभिवंत मत्स्यपालनाचे आकर्षण वाढत आहे. विकसनशील देशांमधील ग्रामीण भागातील लोकांकरिता स्वयंरोजगाराच्या मोठ्या संधी शोभिवंत मत्स्यपालन व्यवसायामध्ये उपलब्ध असून परकीय चलन निर्मितीचा एक प्रमुख स्त्रोत आहे.**



- इनडोअर युनिट : कमी आकाराच्या जागेमध्ये शक्य. घरातील एखादी खोली किंवा पडवीमध्ये मत्स्यसंवर्धन करता येते. मत्स्यबीज उत्पादन व



संवर्धनाकरिता विविध आकारांच्या काचेच्या टाक्या ठेवून मत्स्यसंवर्धन केले जाते. जास्त किंमत मिळवून देणाऱ्या मत्स्य प्रजातीचे बीजोत्पादन आणि संवर्धनाकरिता या प्रकारचे युनिट योग्य आहे. उदा. निऑनटेटा, डिस्क्स, फ्लॉवरहॉर्न, ब्लॅक घोस्ट आदी.
- यार्ड स्केल युनिट : या प्रकारचे युनिट घरामागील पडवी किंवा समोरील अंगण या ठिकाणी पुरेशी जागा उपलब्ध असल्यास करता येणे शक्य आहे. याकरिता १००० ते २००० चौरस फूट जागा योग्य असून, यामध्ये प्लॅस्टिक पूल आणि एफआरपी टॅंक ठेवून मत्स्य संवर्धन करता येते. मत्स्यबीजाचे विक्रीयोग्य आकारापर्यंत संवर्धन करण्याकरिता या प्रकारचे युनिट योग्य असून जास्त संख्येमध्ये पिले देणाऱ्या माशांच्या संगोपनाकरिता योग्य आहे. बाजारपेठेमध्ये मध्यम किंमत मिळणारे शोभिवंत

### मत्स्यपालनाच्या पद्धती

मासे जसे की, एंजल, गोल्डफिश, बार्ब, गुरामी, टेळा इत्यादींच्या संवर्धनाकरिता हे युनिट उपयोगी आहे.
- सिमेंट पॉन्ड युनिट : सिमेंटचे विविध आकाराचे पॉन्ड बांधून मत्स्यबीज संगोपन करण्यात येते. यार्ड स्केल युनिटपेक्षा थोडी मोठी जागा उपलब्ध असल्यास अशा प्रकारचे युनिट बांधून मत्स्यसंवर्धन करणे योग्य ठरते. सुमारे ५००० चौरस फुटापर्यंत जागेमध्ये याप्रकारे एक चांगले युनिट बांधता येऊ शकते. सिमेंट पॉन्ड युनिट बांधण्याकरिता सुरुवातीचा खर्च थोडा जास्त असतो. परंतु याद्वारे सर्वप्रकारच्या माशांचे संवर्धन विक्री योग्य आकारापर्यंत करता येऊ शकते व त्यामुळे मिळणारे उत्पन्न देखील जास्त आहे.
- प्लॅस्टिक अस्तरीकरण तलाव युनिट : बारमाही पाण्याचा स्त्रोत आणि ५ ते १० गुंठे आकाराची मोकळी पडीक जमीन उपलब्ध असल्यास कमी गुंतवणूक करून मत्स्यसंवर्धन करण्याकरिता याप्रकारचे युनिट आदर्शवत आहे. हे युनिट करण्याकरिता जागेचा आकार आणि क्षेत्रफळाप्रमाणे ५ ते १० मीटर लांब, १.५ ते २ मीटर रुंद आणि १.२ मीटर खोल असे तलाव तयार करून त्यामध्ये २५० ते ३५० मायक्रॉन जाडीचे प्लॅस्टिक अस्तरीकरण करण्यात येते. तलावांच्या एकाबाजूने पाइपलाइनद्वारे पाणी घेण्यासाठी व्यवस्था करावी. विरुद्ध बाजूने अतिरिक्त पाणी वाहून जाण्याकरिता पाइप बसवावा. यामुळे तलावांमध्ये १०० ते १२० सेंमी एवढी पाणी पातळी राखता येते. पाणी बदलणे देखील सहज शक्य होते. माशांना नैसर्गिक शत्रूपासून संरक्षण मिळण्यासाठी संपूर्ण युनिटला शेडनेट वापरून आच्छादित करावे. पिले देणारे मासे (गप्पी, स्वोर्डटेल, मोली, प्लॅटी) तसेच कोईकार्प, गोल्डफिश, गुरामी, बार्ब अशा प्रकारच्या माशांच्या संवर्धनाकरिता हे युनिट जास्त योग्य ठरते. अत्यंत माफक खर्चात, कमी जागेत, कमीत कमी साधनसामग्री वापरून व अत्यंत सोपे तंत्रज्ञान वापरून माशांचे संवर्धन करणे शक्य आहे.

### व्यवसायामधील पर्याय जाणून घेऊ

शोभिवंत माशांची पिले योग्य आकारापर्यंत वाढवून विक्री करणे. विविध शोभिवंत माशांचे नियंत्रित वातावरणामध्ये प्रजननाद्वारे बीजनिर्मिती करून मत्स्यसंवर्धकांना पुरविणे. प्रजननक्षम नर व मादी मासे तयार करून विक्री करणे. शोभिवंत मासे व इतर आवश्यक साहित्य विकी (किरकोळ/घाऊक) करणे. शोभिवंत मत्स्यपालन व प्रजननाकरिता लागणारे जिवंत खाद्य निर्मिती करून विक्री करणे. शोभिवंत पाणवनस्पती संवर्धन व विक्री. कार्यालय, हॉटेल तसेच छंदप्रिय ग्राहकांना ‘मत्स्यालय व्यवस्थापन सेवा’ पुरविणे.



## शॉर्ट न्यूज

### विनयभंग प्रकरणी शिक्षकास सश्रम कारावास

**राहुरी :** तालूक्यातील एका शाळेत पिडीत मुली शिक्षण घेत होत्या. आरोपी मदन दिवे हा त्यांना शिक्षक म्हणून शिकविण्यास होता. शिक्षकाने पिडीत मुलींची वर्गामध्ये छेडछाड करून लज्जा उत्पन्न होईल, असे कृत्य केले होते. राहुरी पोलिस ठाण्यात शिक्षका विरोधात विनयभंगाचा गून्हा दाखल केला होता. खटला जिल्हा व सत्र न्यायाधीश सहारे यांच्या समोर चालला. एकुण ९ साक्षीदार तपासण्यात आले. आज सदर खटल्यात आरोपी मदन रंगनाथ दिवे यास न्यायालयाने दोषी धरून त्यास ३ वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा व १० हजार रुपये दंडाची शिक्षा ठोठावली.

### जमिनीच्या वादातून महिलेस मारहाण

**नेवासा :** तालुक्यातील वांजोळी येथे जमिनीच्या वादातून महिलेस मारहाण केल्याची घटना घडली आहे. महिला स्वमालकीच्या वांजोळी शिवार गट १३७ मध्ये काम करत असताना आरोपी नानासाहेब श्रीरंग खंडागळे यांनी महिलेस ही जमीन आमची आहे, या ठिकाणाहून चालते व्हा, असे म्हणत हात धरून तिच्या सोबत लज्जा उत्पन्न होईल, असे वर्तन केले. तशा आशयाची फिर्याद सोनई पोलीस ठाण्यात दिली आहे. आरोपी नानासाहेब श्रीरंग खंडागळे याचे विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास हवालदार दत्ता गावडे हे करत आहेत.

### श्रीगोंद्यात विजेचा खेळखंडोबा, नागरिक त्रस्त

**श्रीगोंदा :** तालुक्यातील ग्रामीण भागासह शहरातील जनता महावितरण च्या कारभाराला कंटाळली असून कोणतेही भारनियमन नसताना वारंवार गायब होणाऱ्या विजेचा खेळखंडोबा झाला आहे. महावितरणचे अभियंता मात्र आपण कुणाला जबाबदार नसल्यासारखे वागत असून सामान्य जनतेच्या तक्रार तर सोडा वेळीच कुठल्या ठिकाणी वीज का बंद पडली, वीज कधी सुरू होईल हे सांगायलाही अभियंता व कर्मचारी तयार नाहीत. कर्मचाऱ्यांनीही ग्राहकांना जेरीस आणले आहे. शहरात तर अखंड चार पाच सलग वीज नसल्याने नागरीकांसह याचा मोठा फटका व्यावसायिकांना बसत आहे.

### ऑनलाईन सट्टा घेणारा पोलिसांच्या ताब्यात

**नगर :** सध्या सुरू असलेल्या आयपीएल मॅचवर ऑनलाईन सट्टा घेणार्या तरूणाला कोतवाली पोलिसांच्या गुन्हे शोध पथकाने पकडले. महेश मनोहर दुडगु असे त्याचे नाव आहे. त्याच्याविरूध्द कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्याच्याकडून रोकड, मोबाईल असा १२ हजार ६७० रूपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. महेश मनोहर दुडगु हा चितळे रस्त्यावरील छाया टॉकीज समोर आयपीएल मॅचवर ऑनलाईन सट्टा घेत आहे, अशी माहिती पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांना मिळाली होती.

### राहाता बाजार समितीत सोयाबीन ४४५० रुपये

**राहाता :** बाजार समितीत सोमवारी सोयाबीनला जास्तीत जास्त ४४५० रुपये भाव मिळाला. सोयाबीनची ३ क्विंटलची आवक झाली. सोयाबीनला किमान ४४०० रुपये, जास्तीत जास्त ४४५० रुपये तर सरासरी ४४२५ रुपये भाव मिळाला.हरभरा सरासरी ५७७८ रुपये भाव मिळाला. गव्हाला किमान २३०० रुपये, जास्तीत जास्त २७०० रुपये तर सरासरी २५०० रुपये भाव मिळाला. डाळींबाच्या ५०० क्रेटसची आवक झाली. डाळींबाला प्रतिकिलोला डाळींब नंबर १ ला १२६ ते १५५ रुपये भाव मिळाला. डाळींब नंबर २ ला ७५ ते १२५ रुपये भाव मिळाला. डाळींब नंबर ३ ला ३१ ते ७४ रुपये भाव मिळाला.

# परभणीतून निवडून आलो नाही तर संन्यास घेईल

**■ महादेव जानकर यांची मोठी घोषणा ■ उद्धव ठाकरेंविरोधात रान उठवण्याचा दिला इशारा**



**परभणी : प्रतिनिधी**

**परभणी लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार महादेव जानकर यांनी एक मोठी घोषणा केली आहे. परभणी लोकसभा मतदारसंघातील मतदारांनी मला आपलेसे केले आहे. मी जवळपास ९०% मतदार संघ फिरलो आहे. येथील नागरिक माझ्या पाठीशी आहेत. या लोकसभा निवडणुकीत माझी लीड साडेचार लाखाची राहील आणि जर परभणीतून निवडून आलो नाही तर मी संन्यास घेईल, अशी घोषणाच महादेव जानकर यांनी केली आहे.**

परभणी लोकसभा मतदारसंघात राष्ट्रीय समाज पक्षाचे महादेव जानकर यांच्या विरोधात महाविकास आघाडीचे बंडू जाधव यांच्यात लढत होत आहे. निवडणुकीच्या प्रचारादरम्यान महादेव जानकर यांनी ही घोषणा केली आहे. सध्या शेतकऱ्यांचा मुलगा राज्याचा मुख्यमंत्री झाला आहे. तर माझ्यासारखा बहुजनांचा मुलगा खासदार झालेला उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे यांना देखावत नाही का? असा प्रश्न महादेव जानकर उपस्थित केला आहे. आदित्य ठाकरे तसेच उद्धव ठाकरे हे अशा प्रकारे माझ्यावर टीका करतील, अशी मला अपेक्षा नव्हती. मात्र आता त्यांनी टीका केली आहे. २६ एप्रिल नंतर राज्यातील ज्या लोकसभा मतदारसंघात निवडणूक होणार आहे, त्या लोकसभा मतदारसंघात उद्धव ठाकरे आणि महाविकास आघाडी विरोधात आपण रान पेटवणार असल्याचा इशारा देखील जानकर यांनी दिला आहे.

उद्धव ठाकरे यांनी केले होते डिपॉझिट जप्त करण्याचे आवाहन परभणी लोकसभा मतदारसंघातील उद्धव ठाकरे गटाचे उमेदवार संजय जाधव यांच्या प्रचारासाठी उद्धव ठाकरे यांच्या सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेमध्ये उद्धव ठाकरे यांनी महादेव जानकर यांचे डिपॉझिट जप्त करा, असे आवाहन मतदारांना केले होते. उद्धव ठाकरे यांच्या या आवाहनाला महादेव जानकर यांनी आता प्रत्युत्तर दिले आहे.

# राज्य सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे - पालकमंत्री राधाकृष्ण विखे



**नगर : प्रतिनिधी**

**अडचणीत सापडलेल्या दूध उत्पादक शेतकऱ्यांना पाच रुपये अनुदान देण्याचा महत्वपूर्ण निर्णय राज्य सरकारने घेतला होता. निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी झाल्यामुळे जिल्ह्यातील ६७ हजार ५४८ शेतकऱ्यांना ६१ कोटी रुपयांचे अनुदान होवू शकले. केंद्र आणि राज्य सरकार हे शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणारे असल्याचे प्रतिपादन पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.**

मंत्री विखे पाटील यांनी श्रीगोंदा, पारनेर या तालुक्यांमध्ये शेतकऱ्यांशी संवाद साधला. विविध ठिकाणी झालेल्या बैठकांमधून त्यांनी केंद्र आणि राज्य सरकारच्या योजनांची माहिती दिली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सर्वसामान्य माणसांच्या हिताचे निर्णय होत आहेत. देश आज विविध क्षेत्रात प्रगती करीत असून, देश महाशक्ती बनण्याच्या दिशेने वाटचाल करीत असल्याचे त्यांनी सांगितले.

राज्य सरकारने शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याची भूमिका नेहमीच घेतली. एक रुपयात पीक विमा योजनाचे लाभ तालुक्यातील शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात मिळाला. अडचणीत सापडलेल्या दूध उत्पादक शेतकऱ्यांना मदत म्हणून राज्य सरकारने पाच रुपये अनुदानाची योजना सुरु केली. आज जिल्ह्यातील बहुसंख्य शेतकऱ्यांच्या खात्यात अनुदान वर्ग झाले असून, सर्व शेतकऱ्यांना या अनुदान योजनेचा लाभ मिळेल.

जिल्ह्यातील तरुणांसाठी रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्यासाठी अनेक उद्योजक आता जिल्ह्यात येण्यास इच्छुक असून, नामवंत कंपन्या येणार असल्यामुळे तरुणांनाही संधी मिळेल. यापुर्वी धाक दडपशाहीमुळे चांगले उद्योग जिल्ह्यातून निघुन गेले. ही परिस्थिती आपल्याला बदलायची असेल तर, उद्योजकांच्या पाठीशी उभा राहणारा खासदार निवडून द्यावा लागेल. देशात पुन्हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वामध्ये सरकार येणार असल्यामुळे जिल्ह्याच्या विकासाला चांगले पाठबळ मिळेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# श्रीरामकृष्ण एज्युकेशन फाउंडेशनच्या उन्हाळी शिबिराची सांगता




**नगर : प्रतिनिधी**

**श्रीरामकृष्ण एज्युकेशन फाउंडेशनचे सेठ नंदलाल धूत इंग्लिश मीडियम स्कूल व मोहनलाल रामावतार मानधना कनिष्ठ महाविद्यालयामध्ये रोटरी क्लबऑफ अहमदनगर प्रियदर्शनीच्या अध्यक्षा देविका रेले यांच्या उपस्थितीत उन्हाळी शिबिराची सांगता.**

शाळा संपली आणि उन्हाळ्याची सुट्टी सुरू झाली की पालकांना प्रश्न पडतो आपल्या मुलांना आपण आपल्या कामात व्यस्त असताना मुलांना मोबाइल न देता कुठे सक्रिय ठेवावे यासाठीच विद्यालयात दहा दिवसीय उन्हाळी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते

यामध्ये चिमुकल्या मुलांनी शिव मल्हार गडावर ट्रेकिंग करून तसेच संकेत फॉर्म वर मनसोक्त खेळून मनमुराद आनंद लुटला. हॉर्स रायडिंग, थ्रीडी शो, मॅजिक शो, पपेट शो त्याबरोबरच विद्यार्थ्यांनी चित्रकला हस्तकला संगीत नृत्य या सर्व उपक्रमांमध्ये सहभाग घेऊन आपल्या सुप्त कलागुणांना प्रकट करून स्वच्छंदीपणे उन्हाळी शिबिरात सहभाग नोंदवला याबरोबरच विद्यार्थ्यांना सकाळी शिबिरात आल्याबरोबर संस्कारमय वातावरणात स्तोत्र तसेच बोधपर गोष्टी सांगून त्यांचे मनोरंजनही करण्यात आले उन्हाळी शिबिराचे महत्त्वपूर्ण आकर्षण म्हणजे पालक आणि विद्यार्थी यांच्यासाठी आयोजित केलेला भारतीय संस्कृतीवर आधारित फॅशन शो यामध्ये पालकही सहभागी झाल्यामुळे आपल्या पाल्याबरोबर आपल्याला वेळ देता आला याचा आनंद पालकांना समाधान देऊन गेला तसेच पालक आणि विद्यार्थी साठी आयोजित केलेले विविध खेळ या उपक्रमातही सर्वांनी अतिशय उत्साहाने सहभाग घेतला. या दहा दिवसात विद्यार्थ्यांना दररोज पौष्टिक नाश्ता देण्यात आला

समारोपाच्या दिवशी विद्यार्थ्यांनी दहा दिवसांमध्ये ज्या गोष्टी आत्मसात केल्या आहेत जसे नृत्य गायन स्तोत्र पाठांतर या सर्वांचे सादरीकरण केले.

सर्वांनीच अतिशय उत्कृष्टरित्या सर्व कला आत्मसात केल्या आहेत व सहभागी विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्रक देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच खेळ आणि फॅशन शो मध्ये उत्कृष्ट सादरीकरण करणाऱ्या पालक व विद्यार्थ्यांना पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले.

यावेळी उपस्थित असलेल्या रोटरी क्लब ऑफ अहमदनगर प्रियदर्शनीच्या अध्यक्षा देविका रेले आपल्या मनोगतात म्हणाल्या की शिबिर हे विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी एक खुले व्यासपीठ आहे तसेच विद्यार्थ्यांनी आपली झेप आकाशासारखी अथांग ठेवावी असा संदेश त्यांनी विद्यार्थ्यांना दिला

संस्थेचे अध्यक्ष श्री श्री गोपाल धूत आपल्या मनोगतात म्हणाले की विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी संस्थाचालक नेहमीच क्रियाशील असतात विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त सहभाग घेऊन आपला सर्वांगीण विकास करावा तसेच शिबिरामध्ये विद्यार्थ्यांनी अतिशय उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला त्याबद्दल त्यांचे आणि पालकांचे कौतुक केले.

विद्यालयाच्या प्राचार्या राधिका जेऊरकर यांनी दहा दिवसाच्या शिबिराच्या आढाव्याचे वाचन केले आजपर्यंत विद्यालयात विद्यार्थ्यांना नेहमीच नवनवीन गोष्टी देण्याचा प्रयत्न शाळा करत असते व इथून पुढेही करत राहील अशी ग्वाही त्यांनी पालकांना दिली तसेच सहभागी पालक आणि विद्यार्थ्यांचे त्यांनी कौतुक केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ मौसमी लोंढे, सुषमा उजागरे यांनी केले यावेळी संस्थेचे अध्यक्ष श्री श्रीगोपाल धूत उपाध्यक्ष श्री मोहनलाल मानधना, श्री राजेश झंवर, संस्थेचे सचिव डॉक्टर शरद कोलते,सहसचिव बजरंग दरक, संस्थेचे सभासद श्री नंदकिशोर शहा, श्री रवींद्र गुजराती, श्री पुरुषोत्तम भाई पटेल, श्री रामसुख मंत्री,श्री श्रीगोपाल जाखोटिया, श्री अरुण झंवर,सौ प्रतिभा धूत, विद्यालयाच्या प्राचार्या सौ राधिका जेऊरकर, समन्वयक सौ अंजना पंडित, संपदा देशपांडे उपस्थित होत्या. आणि संस्थेचे उपाध्यक्ष श्री नंदकुमार झंवर यांनी कार्यक्रमास शुभेच्छा दिल्या.

# प्रेमदान चौकात वारंवार वाहतूक कोंडी

**वाहनचालक सिग्नलचे नियम पाळत नाही**

**नगर : प्रतिनिधी**

**नगर- मनमाड महामार्गावर असलेल्या प्रेमदान चौकात वारंवार वाहतूक कोंडी होणे ही नित्याचीच बाब झाली आहे. त्यामुळे प्रशासनाने आता २४ तास सिग्नल यंत्रणा कार्यान्वित केली आहे. परंतु, या चौकात वाहतूक पोलिसाची कायमस्वरुपी नियुक्ती नसल्याने वाहनचालक सिग्नलचे नियम पाळत नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे अद्यापही**



**किरकोळ अपघात व वाहतूक कोंडीचे चित्र कायम असल्याचे दिसून येत आहे.**

नगर-मनमाड महामार्गावर असलेल्या प्रमुख चौकांपैकी एक प्रेमदान चौक आहे. दिवसभर या चौकामध्ये ये-जा करणाऱ्या वाहनांची संख्या अधिक आहे. परंतु, बेशिस्त वाहनांमुळे या चौकात अनेकदा अपघातही झालेले आहे. सिग्नल सुरू झाल्याने वाहतूक कोंडी व अपघातांवर नियंत्रण येईल, परंतु, या चौकातून जाणारे दुचाकीस्वार व छोटे वाहनचालक सिग्नलचे नियम पाळत नसल्याचे दिसून येत आहे.









# संभाजी ब्रिगेडचा नीलेश लंके यांना पाठींबा

## नाशिकमध्ये बैठक ; शेतकऱ्यांचे आसूड पुस्तक भेट



नाशिक : प्रतिनिधी

**संभाजी ब्रिगेड प्रदेशाध्यक्ष प्रवीण गायकवाड यांनी संभाजी ब्रिगेडच्या नाशिक येथे झालेल्या बैठकीमध्ये महाविकास आघाडीला पाठिंबा देण्याचा निर्णय घेतल्यांनातर संभाजी ब्रिगेड अहमदनगर दक्षिणच्या वतीने महाविकास आघाडीचे उमेदवार नीलेश लंके यांची भेट घेऊन त्यांना महात्मा फुले लिखित शेतकऱ्यांचे आसूड हे पुस्तक भेट देण्यात आले.**

महाविकास आघाडीचे उमेदवार नीलेश लंके यांनी संभाजी ब्रिगेडच्या पदाधिकाऱ्यांना वेळ देऊन विविध प्रश्नांवर चर्चा केली तसेच शेतकऱ्यांच्यासाठी सदैव लढत राहणार असल्याचे सांगितले.
साकळाई पाणी प्रश्न सोडविणार असल्याचे तसेच शेतकऱ्यांच्या कांदा,दूध,कापूस,सोयाबीन यासारख्या पिकांना हमीभाव आणि शेतकऱ्यांना स्वामींनाथ आयोग लागू करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे श्री.लंके यांनी संभाजी ब्रिगेडच्या पदाधिकाऱ्यांना सांगितले

अहमदनगर दक्षिणमधील संभाजी ब्रिगेडचे सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्ते नीलेश लंके यांचा प्रचार करून त्यांना प्रचंड मतांनी विजयी करणार असल्याचे संभाजी ब्रिगेडच्या वतीने सांगण्यात आले.
यावेळी उपस्थित संभाजी ब्रिगेड प्रदेश उपाध्यक्ष शेतकरी आघाडी संग्राम देशमुख,अहमदनगर जिल्हाध्यक्ष अरविंद कापसे,जिल्हा कार्याध्यक्ष सुनील ढवळे,जिल्हा संघटक गणेश पारे,श्रीगोंदा तालुकाध्यक्ष नानाजी शिंदे, कर्जत तालुकाध्यक्ष नवनाथ धनवे, केशव देशमुख , मयूर धनवडे महेश लाहोर ,मुन्ना मुंडे यांच्यासह संभाजी ब्रिगेडचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# व्यापाऱ्यांसाठी विविध सुविधा निर्माण करणार

## ■ खा. डॉ. सुजय विखे पाटील यांची ग्वाही ■ व्यापारी, हमाल आणि मापाडी यांच्याशी साधला संवाद

नगर : प्रतिनिधी

**अहिल्यानगरी मधील व्यापाऱ्यासाठी महायुतीच्या सरकारच्या मार्फत विविध सेवा सुविधा निर्माण करण्याचे आश्वासन महायुतीचे उमेदवार डॉ. सुजय विखे पाटील यांनी दिले. नेप्टी बाजारपेठेतील मधील कांदा मार्केट मध्ये प्रचारार्थ आयोजित केलेल्या सभेत ते बोलत होते. यावेळी त्यांनी व्यापारी हमाल आणि मापाडी यांच्याशी संवाद साधला.**

डॉ. सुजय विखे पाटील यांनी आपल्या लोकसभा मतदार संघात प्रचार सभा, कॉर्नर मिटींग आणि गाठी भेटी देण्यावर भर दिला आहे. याच निमित्ताने ते आज नगर शहरातील कांदा मार्केट मध्ये व्यापारी, हमाल आणि मापाडी यांच्याशी संवाद साधत होते. यावेळी त्याच्यासोबत आमदार संग्राम जगताप, उद्योगपती सचिन कोतकर, अविनाश घुले, निखील वारे आणि अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी खा. विखे यांनी व्यापाऱ्यांना विश्वास दिला की, महायुती सरकार हे व्यापाऱ्याच्या जोडीला आहे. व्यापार वाढविण्याच्या दृष्टीने अत्यावश्यक मुलभूत सेवा सुविधांवर सरकारच्या वतीने भर दिला जाईल. तसेच केंद्र आणि राज्य सरकारच्या योजनांचा पुरेपुर लाभ व्यापाऱ्यांना मिळण्यासाठी त्यांच्याकडून विशेष प्रयत्न केले जातील, असे त्यांनी सांगितले.

तसेच नारायणडोह येथील नवीन रेल्वे स्थानकात कांदा व्यापाऱ्यांसाठी रल्वे धक्का निर्माण केला जाईल. त्यामुळे नगर कृषी उत्पन्न बाजार समितीतील कांदा व्यापाऱ्यांना भारतभर कांद्याचा व्यापार करता येईल. विळद येथील नवीन एमआयडीसी मध्ये केंद्र सरकारच्या माध्यमातून कांद्यावर प्रकिया करण्यासाठी प्रोसेसिंग युनिट उभारणी केली जाईल. चिचोंडी पाटील येथे जनावरांचा बाजार उभा करून पशु व्यवसायाला चालणा देण्याचे काम केले जाईल. त्याच कांद्याच्या साठवणुकीसाठी जागा उपलब्ध करून देणार अशा पद्धतीने व्यापाऱ्यांना सहकार्य करण्याचे आश्वासन त्यांनी दिले. तर सरकार दरबारी असलेले हमाल, मापाडी वर्गाचे विविध प्रश्न प्राथमिकतेच्या जोरावर सोडविले जातील असे ही ते म्हणाले.

देशात पंतप्रधान नरेंद्र मोदी हे नेहमीच गरिबांच्या सोबतीला आहेत. हमाल आणि मापाडी, माथाडी कामगार यांच्या विकासासाठी त्यांनी केलेल्या कामांची त्यांनी माहिती दिली.व्यापारी वर्गासाठी मोदी सराकारनेमागील १० वर्षात विविध योजना आणुन त्या प्रभावीपणे राबविल्या आहेत.यामुळे पुन्हा व्यापाऱ्यांच्या हितासाठी नरेंद्र मोदी यांना पंतप्रधान करणे गरजेचे आहे. आपले एक मत हे मोदींच्या पंतप्रधान पदाचा मार्ग बळकट करण्यासाठी आहे. यासाठी महायुतीच्या बीड मधून पंकजा मुंडे आणि नगर मधून आपल्याला मतदान करण्याचे आवाहन त्यांनी केले.




### शरद पवारांवर डॉ. विखेंनी साधला निशाणा

**ज्याने मागील ४० वर्षात केवळ मुंडे परिवाला त्रास देण्याचे काम केले. त्यांना यावेळी त्यांची जागा दाखवा. अशा शब्दात नाव न घेता, खा. डॉ. सुजय विखे पाटील यांनी शरद पवार यांच्यावर निशाणा साधला. डॉ. विखे म्हणाले की, ज्यांनी सातत्याने मुंडे परिवाला राजकारणातून हद्दपार करण्याचा प्रयत्न केला. त्यांना संपवण्यासाठी वेळोवेळी कट कारस्थाने रचली अशांना आता मुंडे साहेबांच्या समर्थकांनी चांगला धडा शिकवला पाहिजे. त्यासाठी पंकजाताई यांना मोठ्या मदाधिक्याने निवडून द्या असे आवाहन त्यांनी केले.**

# वासुंदे येथे श्री बिरोबा महाराज उत्सवाला सुरवात

## शनिवारी बैलगाडयांच्या शर्यती





वासुंदे : प्रतिनिधी

**पारनेर तालुक्यातील वासुंदे येथे ग्रामदैवत श्री बिरोबा महाराज सार्वजनिक उत्सव गुरुवार दि. २५ एप्रिल पासून सुरू होत आहे. गुरुवारी सकाळी ९ वाजता श्री बिरोबा महाराज अभिषेक व आरती होणार आहे. दुपारी चार ते सात या वेळात भव्य काठी मिरवणूक व मांडव डहाळे रात्री नऊ नंतर श्री बिरोबा महाराज स्तुती पर कवणांचा (ओव्या) कार्यक्रम होईल.**

शुक्रवार दि २६ एप्रिल रोजी सकाळी ९ ते ११ या काळात रामाणाचार्य, भागवताचार्य ह. भ. प. साध्वी वैष्णवी सरस्वती दीदी यांचे सुश्राव्य कीर्तन होणार असून कीर्तनानंतर महाप्रसाद आयोजन केले आहे.

शनिवार दि. २७ एप्रिल रोजी बैलगाड्यांच्या शर्यती होत असून यात ५१ हजारापासून ते ३१ हजारापर्यंत बक्षिसे दिली जाणार आहे. वासुंदे तालुका पारनेर येथील ग्रामदैवत श्री बिरोबा महाराज सार्वजनिक उत्सवात सहभागी होण्याचे आवाहन संयोजकांनी केले आहे.

# शांताराम शेवाळे यांची मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टला एक लाख रुपये देणगी

## शेवाळे कुटुंबाला यात्रा, दसरा, पालखीचा मान



निघोज : प्रतिनिधी

**पुणे येथील शांताराम रघुनाथ शेवाळे यांनी मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टला एक लाख रुपयांची ऑनलाईन देणगी पाठवली आहे. शेवाळे यांचे गाव निघोज आहे. मात्र शासकीय सेवेत कार्यरत असताना ते पुणे येथे स्थायिक झाले. सध्या ते सेवानिवृत्त असून पुणे येथे स्थायिक झाले आहेत.**

शेवाळे कुटुंबाला मळगंगा देवीच्या यात्रा,दसरा तसेच उत्सवासाठी अद्धागिरी या पालखीचा मान आहे.

यात्रा तसेच इतर उत्सवाच्या निमित्ताने शेवाळे कुटुंबातील सदस्य देवी दर्शनासाठी येत असतात. शेवाळे यांना मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्ट, निघोज व मुंबईकर मंडळ यांनी धन्यवाद व्यक्त करीत आभार मानले आहेत.

### माता मळगंगा हे एक राज्याचे जागृत

**देवस्थान आहे. गेली ७० ते ७२ वर्ष देवीच्या आशीर्वादाने आमचे कुटुंब आमचा शेवाळे परिवार तसेच नातेवाईक मित्र यांना समृद्धी मिळाली आहे. नवसाला पावणारी देवी म्हणून मळगंगा देवीचा राज्यात नावलौकिक आहे. आपण दिलेली देणगी सत्कारणी लागेल यातून गावच्या विकासात आपला खारीचा वाटा असला पाहिजे ही आपली कर्तव्य भावना आहे.**

**शांताराम रघुनाथ शेवाळे**
**सेवानिवृत्त अधिकारी पुणे**

# करंदीत अवकाळी व वादळी पावसामुळे शेतकऱ्यांचे नुकसान

## महसूल विभागाकडून पंचनामे पुर्ण

करंदी : प्रतिनिधी

**पारनेर येथे शनिवारी सायंकाळी झालेल्या अवकाळी वादळी पावसाने शेतकऱ्यांच्या शेतीमालाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.या नुकसानीचे महसूल विभागाकडून पंचनामे पुर्ण झाली आसल्याची माहिती तहसीलदार गायत्री सैंदाणे यांनी दिली.**

करंदी परिसरातील गावांमध्ये वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसामुळे शेतकऱ्यांच्या कांद्यासह आंबा, डाळिंब बागा व पॉलिहाऊसचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.जोराच्या वाऱ्यामुळे पत्रे उडाली आहे. आंब्याची झाडे तुटून पडलेली आहेत. शेतकरी गबाजी विठोबा ठाणगे यांच्या गोठ्याचे पत्रे उडून गेले त्यांचे आंब्याच्या बागेचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. राजेंद्र चिमाजी ठाणगे यांच्याही आंबा बागेचे नुकसान झाले आहे.

बाळू कुंडलिक ठाणगे यांच्या डाळिंब बागेचे नुकसान झाले आहे. संतोष रामभाऊ ठाणगे यांचे पॉलिहाऊसमध्ये असणाऱ्या काकडीचे नुकसान झाले असून पॉलिहाऊसचे पूर्णपणे नुकसान झाले आहे. काढणीला आलेल्या कांद्याचे नुकसान झाले आहे. या नुकसानीमुळे शेतकरी मोठ्या प्रमाणात संकटात आले आहेत नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. गेल्या तीन ते चार दिवसांपासून पारनेर तालुक्यात ढगाळ हवामान असल्याने बराच भागात आवकाळी पावसाने हजेरी लावली. अचानक आलेल्या यापावसामुळे अनेकांची तारांबळ उडाली.



# संप्रदाय सुख, समाधान प्राप्त करण्याचे विचार शिकविणारा - बाळकृष्ण महाराज कांबळे

## सोबलेवाडी येथे अखंड त्रिदीनी नाम जप व हनुमान जन्म उत्सव सोहळा संपन्न




सोबलेवाडी : प्रतिनिधी

**वारकरी संप्रदाय सर्व मानव जातीच्या सर्वांगीण कल्याणासाठी तसेच सुख समाधान प्राप्त करण्याचे विचार शिकविणारा असल्याचे प्रतिपादन ह. भ. प. बाळकृष्ण महाराज कांबळे यांनी सोबलेवाडी येथे आयोजित अखंड त्रिदिणी नाम जप व हनुमान जन्म उत्सव सोहळा प्रसंगी केले.**

या सुश्राव्य काल्याच्या सोहळ्या प्रसंगी ह. भ. प. दगडू महाराज शेळके, ह. भ. प. देवराम धोंडीभाऊ शेरकर (सोबले), मृदुंगाचार्य ह.भ.प. मृदंगसम्राट आदिनाथ महाराज गलधर, ह.भ.प.कैलास महाराज शिंदे, गायनाचार्य ह.भ.प.रामेश्वर महाराज मस्के, ह.भ.प. सुररत्न शिवाजी महाराज माने, ह.भ.प. प्रभू महाराज लांडे, विणेकरी ह. भ. प. साहेबराव महाराज सोबले, कीर्तनसाथ हनुमान भजनी मंडळ सोबलेवाडी, संतदास वारकरी शिक्षण संस्था पैठण विद्यार्थी, चोपदार ह.भ.प.थोपटे महाराज, रामविजय ग्रंथ पारायण ह.भ.प. सिताराम शेळके महाराज, आदी ह.भ.प.महाराज उपस्थित होते.

कांबळे महाराज उपदेश करताना म्हणाले कि, आपला भारत देश हा साधू संतांचा, देवाचा, ऋषीमुनींच्या, शूरवीरांचा येथे सुरू संतांचे विचार जन माणसाच्या कणाकणात रुजलेले आहेत. आपली भारतीय संस्कृती ही जगात सर्वश्रेष्ठ आहे. आपल्या भारतीय संस्कृतीने परदेशालही आकर्षित केले. देव, देश आणि धर्म यासाठी अनेकांनी योगदान दिले आहे. आपल्या प्राणांची आहुती दिली आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे आचार, विचार, अंगी बाळगले तर जीवन सुजलाम सुफलाम झाल्याशिवाय राहणार नाही. वारकरी संप्रदाय सर्वांना सुख समाधान प्राप्त करण्याचे विचार शिकविणार आहे त्यांचे विचार आणि माणूस वागला तर तो चांगले जीवन जगू शकतो. पारनेर तालुक्यात वारकरी संप्रदाय व संतांचे विचार घराघरात पोहोचवण्याचे काम नानांनी केले त्यांच्या विचाराने प्रेरित होऊन पारनेर तालुक्यातील तरुण पिढी परमार्थाकडे आकर्षित झाली आहे.

संतदास वारकरी शिक्षण संस्था पैठण व गायनाचार्य रामेश्वर महाराज म्हस्के व सुररत्न शिवाजी महाराज माने यांनी शिवाजी महाराज यांचा पोवाडा गाऊन काल्याच्या कीर्तनाची सांगता झाली. संयोजकांच्या वतीने भाविक भक्त यांना मंदिर देवस्थान जीर्णोद्धार कामी देणगी देण्याचे जाहीर आवाहन करण्यात आले.

### शेरकर कुटुंबीयांचे योगदान

**मूळचे सोबलेवाडी येथील व सध्या मुंबई स्थित असलेले भाविक भक्त उद्योजक भागाशेठ शेरकर यांनी मंदिर कळसाच्या जीर्णोद्धार साठी १ लाख ११ हजार १११ रुपये देणगी देण्याचे जाहीर केले आहे.**

# उत्कर्षा रूपवते यांची ६६ लाखांची संपत्ती; वित्तीय संस्थाकडून कर्ज

राहाता : प्रतिनिधी



**वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार उत्कर्षा रुपवते यांनी बुधवार (ता. २४) शिर्डी लोकसभा मतदारसंघातून उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. त्यासोबत दिलेल्या शपथपत्रात उत्कर्षा रुपवते यांची व त्यांच्या पतीची स्थावर मालमत्ता २३ लाख ६५ हजार व ४२ लाखांची जंगम मालमत्ता आहे. रुपवते यांच्यावर एकूण ३३ लाखांचे कर्ज आहे.**

उत्कर्षा रूपवते यांच्याकडे अकोले येथे वारसा हक्काने मिळालेले घर आहे. त्याचे सध्याचे बाजारमूल्य २३ लाख ६५ हजार रुपये आहे. याशिवाय रुपवते यांच्याकडे २३ लाख ५५ हजार रुपयांचे ३५० ग्रॅम, तर पतीकडे ४ लाख ५० हजारांचे ६० ग्रॅम सोने आहे. उत्कर्षा रुपवते यांच्याकडे १ लाखाची, तर त्यांच्या पतीकडे दीड लाखाची रोख रक्कम आहे. दोघा पती पत्नीचे वार्षिक उत्पन्न २४ लाख आहे. उत्कर्षा रूपवते व त्यांच्या पतीने मुंबईतील विविध वित्तीय संस्थांकडून कर्ज घेतलेले आहे. उत्कर्षा रुपवते यांनी मुंबईतील टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशियल सायन्समधून एम. ए. सोशल वर्क ही पदवी प्राप्त केलेली आहे.


# शिरुरमध्ये महिलेवर गुंतागुंतीची शस्त्रक्रिया यशस्वी

## मातोश्री मदनबाई धारीवाल हॉस्पिटलच्या डॉक्टरांची कामगिरी

शिरूर : प्रतिनिधी

**शिरुर येथील मातोश्री मदनबाई धारीवाल हॉस्पिटलमध्ये नुकतीच एका महिलेच्या डाव्या मांडीवर एक दुर्मिळ व अतिशय गुंतागुंतीची शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पडली. ग्रामीण भागातील अशा प्रकारची अतिशय जोखमीची पार पडलेली ही पहिलीच शस्त्रक्रिया होय.**

शिरुर तालुक्यातील एका गावातील ६५ वर्षांची एक महिला पायाची व्याधी घेऊन अवघडलेल्या अवस्थेत मातोश्री मदनबाई धारीवाल हॉस्पिटलमध्ये दाखल झाली होती. या महिलेच्या डाव्या मांडीवर साधारण १ वर्षापासुन मोठी गाठ तयार झाली होती. एमआरआय स्कॅन केला असता असे आढळून आले की खोलवर पसरलेली ती गाठ असून गाठीच्या बाजूने पायाच्या मोठ्या रक्तवाहिन्या चिकटलेल्या होत्या, अत्यंत गुंतागुंतीची ही शस्त्रक्रीया, कुठलाही - रक्तस्त्राव होऊ न देता पुण्याच्या सुप्रसिद्ध रूबी हॉल क्लिनिक संचालित मातोश्री मदनबाई धारीवाल हॉस्पिटलमध्ये मध्ये अतिशय यशस्वीरीत्या पार पाडली गेली.



या शास्त्रक्रियेसाठी रुबी हॉलचे प्रख्यात डॉ. प्रमोद कदम, डॉ. विशाल पानशेवडीकर आणि शिरूरचे नावलौकिक असलेले भूलतज्ज्ञ डॉ. केतन गवारी, तसेच हॉस्पिटलचे एक्सपेरिन्स स्टाफ सिस्टर रेश्मा कवठाळे , ओटी टेक्निशियन सागर खाजेकर तसेच वार्डबॉय संतोष गाडे यांनी हि शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण करण्यास मोलाचे योगदान दिले.
शिरूरवासियांना अशा कोणत्याही किचकट सर्जरीसाठी आता पुण्याला जाण्याची आवश्यकता नाही. रुबीहॉल च्या उत्कृष्ट सेवा आता इथेच उपलब्ध होत आहेत, अशी माहिती रुग्णालय प्रशासनाच्यावतीने देण्यात आली.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com